# समाज विकास विभाग, पुणे महानगरपालिका
## जाहीर प्रकटन सन २०२१–२०२२

**महिला व बाल कल्याण योजना, युवक कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना या योजनांअंतर्गत युवक, युवती, नागरिकांकडून खालील योजनांसाठी अर्ज मागविणेत येत आहे.**

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | **इ. १० वी तील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य** | इ. ९ वीमध्ये ५०% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळाले असल्यास व वाल्मिकी समाजातील ४५% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना इ. १० वीमध्ये प्रवेश घेतला असल्यास खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य देणेत येते. |
| २. | **कमवा व शिका** | सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात इ. ११ वी व त्यापुढील शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत दरमहा शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. यासाठी मागील वर्षात ५०% गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| ३. | **इ. १२ वी तील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लाससाठी अर्थसहाय्य** | सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात इ. १२ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना (इ. ११ वीत ६०% वा त्यापेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक) खाजगी क्लास करिता अर्थसहाय्य देणेत येते. फक्त कॉमर्स व शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यानीच अर्ज करावेत. |
| ४. | **सी.ई.टी. परिक्षेस बसण्यासाठी अर्थसहाय्य** | सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात इ. १२ वीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सी.ई.टी. परिक्षे करीता प्रवेश शुल्कासाठी अर्थसहाय्य देणेत येते. इ. ११ वीत ६०% वा त्या पेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक. |
| ५. | **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता सायकल सुविधा** | (फक्त मागासवर्गीयांसाठी) सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात किमान इयत्ता ११ वी तसेच त्या पुढील वर्गात मान्यता प्राप्त कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अगोदरचे परिक्षेमध्ये ५०% गुण मिळाले असल्यास तसेच घरापासून महाविद्यालयाचे अंतर २ कि.मी. पेक्षा जास्त असल्यास सायकल घेणेकरीता अर्थसहाय्य देणेत येते. |
| ६. | **स्वयंरोजगारासाठी अनुदान** | १८ ते ४५ वयोगटातील स्त्री/पुरूषांना स्वत:चा स्वयंरोजगार सुरू करावयाचा असल्यास अथवा सुरू असलेल्या व्यवसाय वाढीसाठी एकदाच अर्थसहाय्य देणेत येते. |
| ७. | **परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुदान** | पुणे महानगरपालिका हद्दीतील त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय/अभियांत्रिकी/संगणकीय/व्यवस्थापन/विधी/वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय पाच विद्यार्थ्यांना तसेच आर्थिक दुर्बल घटकातील पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी रक्कम रूपये दोन लाख एकदाच अर्थसहाय्य देणेत येते. |
| ८. | **पुणे मनपातील घाणभत्ता मिळणाऱ्या मागासवर्गीय सेवकांचे मुलांसाठी अर्थसहाय्य** | पुणे मनपातील घाणभत्ता मिळणाऱ्या मागासवर्गीय सेवकांचे मुलांसाठी (इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना) शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. |
| ९. | **पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य** | पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना (इ. ८ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी) शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य देणेत येते. |
| १०. | **उच्च व्यावसायिक तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या** | वैद्यकिय, इंजिनिअरिंग, व्यवस्थापन, संगणकीय इ. शाखांच्या पदविका, पदवी, |

| अ.क्र. | योजनेचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| | **<u>विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य</u>** | पदव्युत्तर, अभ्यासक्रमास शासनमान्य शिक्षण संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना (मागील वर्षी ६० टक्के वा त्यापेक्षा अधिक गुण मिळणे आवश्यक) शैक्षणिक अर्थसहाय्य देणेत येते. |

**उपरोक्त योजनांचे अर्ज दि.१३ ऑक्टोबर २०२१ ते दि.३१ डिसेंबर २०२१ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने dbt.punecorporation.org या संकेतस्थळावरती भरणेत यावेत.**

या बाबतचा तपशील व अटी व शर्ती या पुणे महानगरपालिकेच्या **dbt.punecorporation.org** या संकेतस्थळावरती बघण्यात यावे. अधिक माहितीसाठी संपर्क क्र. १८००१०३०२२२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

**(रंजना गगे)**
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका